**(CNR No.:-MHSN02-000795-2012)**

## विशेष दिवाणी दावा क्रमांक ६८/२०१२

***(निशाणी १८३ खालील आदेश)***

१. प्रतिवादी क्रमांक ११ तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्रमांक ११ चा अर्ज थोडक्यात पुढीलप्रमाणे; वादीने प्रस्तुतचे वादपत्र खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेसाठी, तसेच निरंतरची मनाई व वैकल्पिकरीत्या कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेले आहे. वादपत्रात प्रतिवादी क्रमांक ११ विरुध्द कोणताही आरोप अथवा तक्रार नमूद नाही. मात्र, भविष्यामध्ये खरेदीपत्राच्या आधारे गट क्रमांक ४९/१ या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्रमांक ५ ते ९ यांच्या नावाची नोंद करण्याबाबतचे आदेश, तसेच बिनशेती न करणेबाबतचा आदेश होऊन मिळणेची मागणी केलेली आहे. भविष्यात होणा–या आदेशाबाबत वादीस कोणतीही दाद मागता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ११ यास या प्रकरणातून वगळण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. वादीने निशाणी १८४ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविलेला आहे व प्रतिवादी क्रमांक ११ चा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्रमांक ११ तर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील आणि वादी तर्फे ॲड. एम. बी. कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

५. या अर्जाच्या निर्णयासाठी माझ्यापुढे उपस्थित झालेला मुद्दा व त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे;

| अ.क्र | मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्रमांक ११ या दाव्यास आवश्यक पक्षकार आहे काय ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर. |

# <u>कारणमीमांसा</u>

६. **<u>मुद्दा क्रमांक १ करिताः–</u>**

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम १ नियम ३ मध्ये एकच कृती किंवा संव्यवहार अथवा कृतींची किंवा संव्यवहाराची मालिका यांच्या संबंधातील किंवा त्यामधून उदभवणारा अनुतोष मिळण्याचा कोणताही अधिकार संयुक्तपणे काही व्यक्ती मिळून त्यांच्या ठायी किंवा अलगअलगपणे किंवा वैकल्पिकपणे त्यापैकी कोणाच्या तरी ठायी अस्तित्वात आहे असे अभिकथन करण्यात आले असेल तर त्या बाबतीत आणि जर अशा व्यक्तींविरुध्द स्वतंत्र दावे आणले किंवा कोणताही कायदेविषयक किंवा तथ्य विषयक सामाईक प्रश्न उदभवण्याची शक्यता असेल त्याबाबतीत अशा सर्व व्यक्तींना एकाच दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करुन घेता येईल. मात्र, प्रतिवादींना कोणत्याही प्रकारे सामील केल्यामुळे दाव्याच्या संपरिक्षामध्ये गोंधळ उडणार अशा व्यक्तींच्या बाबतीत स्वतंत्र संपरिक्षा करण्याचे आदेश न्यायालय देऊ शकते.

७. तसेच क्रम १ नियम १० उपनियम २ अन्वये कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकाराकडून आलेल्या अर्जावरुन किंवा तसा अर्ज आलेला नसतानाही न्यायालयास आणि न्यायालयास न्याय वाटतील अशा अटींवर वादी किंवा प्रतिवादीने अवैधपणे सामील करुन घेतलेल्या एखादया पक्षकाराचे नाव खोडुन टाकण्यात यावे असा आदेश न्यायालयास देता येईल.

८. प्रस्तुत वादपत्रातील वाद विषय पाहिला. प्रतिवादी क्रमांक १ ते ९ यांनी वादीकडून फसवून खरेदीपत्र करुन घेतलेले आहे, त्या आधारे प्रतिवादी क्रमांक ११ च्या अधिका-यांनी दावा मिळकतीत नोंदी लावलेल्या आहेत अशा प्रकारचे कथन वादपत्रात नमूद आहे. वादपत्रातील परिच्छेद क्रमांक ११ मध्ये वादाचे कारण नमूद केले आहे. त्यामधे प्रतिवादी क्रमांक ११ चा सहभागाबद्दल मजकूर नमूद नाही.

९. वादीने वादपत्र कलम १२.१ मधे वादातील खरेदीपत्र रद्दबातल होऊन मिळणेची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने त्याने वादपत्राचे परिच्छेद क्रमांक १२.६ मधे "*वरीलप्रमाणे आर.ई.नं. ३९२९/२०११ या क्रमांकाने नोंदणी झालेला सब-रजिस्ट्रार, मिरज नं.२, मिरज यांचेकडील दावा मिळकत कलम ५.२ संबंधातील वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ९ यांचे दरम्यान नोंद झालेला खरेदीपत्र व खरेदी व्यवहार मा. कोर्टाचे आदेशाने रद्दबातल ठरविला असलेचा हुकुमनामा मा. सबरजिसट्रार, मिरज नं. २, मिरज यांचेकडे पाठविला जाऊन इंडेक्स नं. २ कडील वरील खरेदीपत्राची क्र. ३९२९/२०११ कडील नोंद रद्द*

*करणेबाबतचे आदेश प्रतिवादी क्र. ११ चे वतीने कार्यरत असलेल्या मा. सब–रजिस्ट्रार, मिरज नं. २ यांना तदनुषंगिक मनाईचे आदेश या स्वरुपात केले जावेत.*" असे नमूद केले आहे. यावरुन वादीची अशी विनंती असल्याचे दिसुन येते की, प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ व वादी यांच्या दरम्यान नोंद झालेले खरेदीपत्र व खरेदी व्यवहार या न्यायालयाने रद्दबातल ठरविल्यानंतर तो हुकूमनामा दुय्यम निबंधक, मिरज यांच्याकडे पाठविला जाऊन अनुसूची क्रमांक २ कडील खरेदीपत्र क्रमांक ३९२९/२०११ कडील नोंद रद्द करणेबाबतचा आदेश प्रतिवादी क्रमांक ११ ला व्हावा अशी वादी विनंती वादपत्रामध्ये करित आहे.

१०. तसेच परिच्छेद क्रमाक १२.९ मध्ये असे नमूद आहे की, "*प्रतिवादी क्रमांक ५ ते ९ व वादी यांच्यामध्ये झालेले खरेदीपत्र व खरेदी व्यवहार या न्यायालयाने रद्दबातल ठरविला असलेचा हुकूमनामा प्रतिवादी क्रमांक ११ तर्फे कार्यरत असलेले मा. उपविभागीय अधिकारी, यु.एल.सी., सांगली यांच्याकडे अथवा गुंठेवारी प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर मिळकतीस बिनशेती प्रमाणपत्र द्यावयाचे अधिकार प्रदान झालेल्या कोणाही प्रतिवादी क्रमांक ११ चे कोणतेही शासकीय अधिका–याकडे पाठविला जाऊन त्यास वरील मिळकतीस बिनशेती परवाना गुंठेवारी नियमितीकरण कायदा, २००१ च्या तरतुदीनुसार अथवा महाराष्ट्र महसूल अधिनियमातील अन्य तरतूदीनुसार दिला जाऊ नये*" अशी तदनुषंगिक मनाईचा अनुतोष मागितलेला आहे. गुंठेवारी नियमितीकरण अधिनियमानुसार वाद प्रलंबित असेल तर त्याचे नियमतीकरण करता येणार नाही, हे त्या अधिनियमामध्ये नमूद आहे.

११. प्रतिवादी क्रमांक ११ च्या अनुपस्थितीमध्ये या वादपत्राचा अंतिम निकाल होऊ शकतो. वादी व प्रतिवादी क्रमांक ५ ते ८ यांच्यामध्ये झालेले तारीख ०५/०९/२०११ रोजीचे खरेदीपत्र जर न्यायालयाने रद्द ठरविले, तर तो निर्णय प्रतिवादी क्रमांक ११ वर बंधनकारक असणार नाही. ते खरेदीपत्र रद्द केले अथवा नाही केले तरीही त्याचा परिणाम प्रतिवादी क्रमांक ११ वरती होणार नाही. प्रतिवादी क्रमांक १ ते ९ विरुध्द झालेला आदेश परिपूर्तीसाठी प्रतिवादी क्रमांक ११ ची आवश्यकता नाही.

१२. प्रतिवादी क्रमांक ११ हे महाराष्ट्र सरकार आहे. त्याचा खर्च व विनिमय करदात्यांनी भरलेल्या करामधून चालतो. प्रतिवादी क्रमांक ११ ला कारणाशिवाय या वादाचे कामी पक्षकार केल्यास, विनाकारण या वादपत्राचा खर्च प्रतिवादी क्रमांक ११ यास सहन करावा लागणार आहे व पर्यायाने त्याचा भार सामान्य नागरिकांना सहन करावा लागणार आहे. तसेच, प्रतिवादी क्रमांक ११ च्या अनुपस्थितीमध्ये वादपत्र चालल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही व वादपत्रातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यास कोणतीही अडचण येणार नाही.

१३. उपरोक्त विवेचनानुसार मुद्दा क्रमांक १ बाबत माझा अभिप्राय नकारार्थी आला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ११ चा प्रस्तुत अर्ज मंजूर होणे संयुक्तीक रहील. प्रतिवादी क्रमांक ११ यास वगळणे संयुक्तीक रहील. सबब, मुद्दा क्रमांक १ बाबत माझा अभिप्राय नकारार्थी नोदंविण्यात येत आहे.

१४. **मुद्दा क्रमांक २ करिताः–**

प्रतिवादी क्रमांक ११ यास या वादपत्रातील जरुर ते पक्षकार म्हणून वगळले आहे. त्यामुळे वादीने वादपत्रातील परिच्छेद क्रमांक १२.६ आणि १२.९ मध्ये नमूद केलेल्या मागण्या या अनुषंगिक नाहीत त्या मागण्या वगळल्यास वादपत्राच्या अंतिम निर्णयावर व वादीच्या वादपत्रामधे जो मुख्य अनुतोष आहे, त्यावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. तसेच, दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १६ प्रमाणे आवश्यक नसलेला भाग वगळण्याचा अधिकार न्यायालयास आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे;

## आ दे श

१. प्रतिवादी क्रमांक ११ याचे पक्षकार म्हणून व त्याचे अनुषंगाने असलेल्या वादपत्रातील परिच्छेद क्रमांक १२.६ व १२.९ मधील नमूद अनुतोष काढुन टाकण्यात येत आहे.

२. वादीने सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

सही/–

सांगली. (वि. रा. पाटील)

दिनांकः– २३/०८/२०१८ तिसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.